भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# साथरोग अधिनियम, १८९७

(सन १८९७ चा अधिनियम क्रमांक ३)

[१ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान]

# The Epidemic Diseases Act, 1897

## (Act No. 3 of 1897)

[*As in force on the 1st March 1989*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री महाराष्ट्र शासन, यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९९१

[किंमत रु. १.४०]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च, १९८९ रोजी यथाविद्यमान असलेला दि एपिडेमिक डिसीज अॅक्ट, १८९७ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १; खंड १ अंक १ दिनांक ९ जुलै, १९९० यात पृष्ठ ४४ ते ४५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ जुलै १९९०.

व्ही. एस. रमादेवी,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of The Epidemic Disease Act, 1897 as on the 1st March, 1989 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, part XII, Section 1, No. 1, Vol. 1, dated 9th July, 1990 on pages 44 to 45.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

New Delhi, 9th July 1990.

एच ४७९५(१५८४—६-९१)

# साथरोग अधिनियम, १८९७

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. १९१४ चा अधिनियम क्रमांक १०.
२. १९२० चा अधिनियम क्रमांक ३८.
३. अनुकूलन आदेश, १९३७.
४. अनुकूलन आदेश, १९५०.
५. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६.

## महाराष्ट्र सुधारणा अधिनियम

१. १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२.

# साथरोग अधिनियम, १८९७

## (महाराष्ट्र विशोधनांसह)

---

### कलमांचा क्रमांक

---


कलमे

१. संक्षिप्त नाव आणि विस्तार.

२. घातक साथरोगांबाबत विशेष उपाययोजना करण्याची आणि निबंध विहित करण्याची शक्ती.

२.क. केंद्र सरकाच्या शक्ती.

२.ख. शक्ती सोपवणे.

३. शास्ती.

४. या अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

# साथरोग अधिनियम, १८९७

(सन १८९७ चा अधिनियम क्रमांक ३)[1]

(दिनांक १ मार्च, १९८९ रोजी यथाविद्यमान)

[४ फेब्रुवारी, १८९७]

**घातक अशा साथरोगांच्या प्रसारास अधिक परिणामकारक रीतीने प्रतिबंध करण्यासाठी उपबंध करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, घातक अशा साथरोगांच्या प्रसारास अधिक परिणामकारक रीतीने प्रतिबंध करण्यासाठी उपबंध करणे समयोचित आहे;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव आणि विस्तार.**

१. (१) या अधिनियमास 'साथरोग अधिनियम, १८९७' असे म्हणता येईल.

[2][(२) त्याचा विस्तार, [3][दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी जी राज्यक्षेत्रे भाग 'ख' राज्यात समाविष्ट होती ती राज्यक्षेत्रे] वगळून, संपूर्ण भारतावर आहे.]

[4]* * * * *

**घातक साथरोगांबाबत विशेष उपाययोजना करण्याची आणि निर्बंध विहित करण्याची शक्ती.**

[5]२. (१) जेव्हा [6][राज्य शासनाची] कोणत्याही वेळी अशी खात्री झाली असेल की, [7][राज्यात] किंवा त्याच्या कोणत्याही भागात कोणत्याही घातक अशा साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे किंवा असा प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण झालेला आहे, आणि, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याचे सर्वसाधारण उपबंध हे, अशा रोगाच्या प्रादुर्भावास किंवा त्याच्या प्रसारास प्रतिबंध करण्यास अपुरे आहेत असे [8][त्यास] वाटत असेल तेव्हा, [9][राज्य शासन] अशा प्रादुर्भावास किंवा प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी [8][त्यास] आवश्यक वाटतील त्या उपाययोजना स्वतः करू शकेल किंवा एखाद्या व्यक्तीस तसे करण्यास फर्मावू शकेल अगर तिला तसे करण्याची शक्ती देऊ शकेल आणि जाहीर नोटिशीद्वारे, आवश्यक वाटतील असे तात्पुरते निर्बंध विहित करून, जनतेने किंवा कोणत्याही व्यक्तीने किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तीने त्यांचे पालन केले पाहिजे असे फर्मावू शकेल, आणि तसेच, झालेला खर्च (भरपाईची रक्कम असेल तर अशी रक्कम धरून) कशा रीतीने व कोणाकडून भागवण्यात येईल ते ठरवून देऊ शकेल.

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी उपबंधांच्या व्यापकतेस बाध न येता [10][राज्य शासनास] पुढील गोष्टींसाठी उपाययोजना करता येतील आणि निर्बंध विहित करता येतील :—

(क) [11]* * * * *

---

१. हा अधिनियम (१) पंजाबला लागू करताना, साथरोग (पंजाब विशोधन) अधिनियम, १९४४, (१९४४ चा पंजाब अधिनियम ३) याद्वारे; पूर्व पंजाबला लागू करताना, १९४७ चा पूर्व पंजाब अधिनियम १, याद्वारे; (२) मध्यप्रांत आणि वऱ्हाडला लागू करताना, मध्यप्रांत आणि वऱ्हाड साथरोग (विशोधन) अधिनियम, १९४५, (१९४५ चा मध्यप्रांत आणि वऱ्हाड अधिनियम ४) याद्वारे विशोधित करण्यात आलेला आहे.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

३. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे "भाग 'क' राज्ये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. १९१४ चा अधिनियम १०, कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे, पोटकलम (२) च्या शेवटी असलेला "आणि" हा शब्द व पोटकलम (३) निरसित करण्यात आले.

५. या कलमान्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनांसाठी निरनिराळे स्थानिक नियम व आदेश पहावेत.

६. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. वरील आदेशाद्वारे "भारतात" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

८. वरील आदेशाद्वारे "तो" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

९. वरील आदेशाद्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१०. वरील आदेशाद्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलला" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

११. वरील आदेशाद्वारे खंड (क) वगळण्यात आला.

(ख) रेल्वेने किंवा अन्य प्रकारे प्रवास करणाऱ्या व्यक्तींची तपासणी करणे, आणि ज्या व्यक्ती अशा कोणत्याही रोगामुळे संसर्गदूषित झाल्या आहेत असा निरीक्षक अधिकाऱ्याला संशय असेल, त्या व्यक्तींना रुग्णालयात, तात्पुरत्या जागेत किंवा अन्यत्र वेगळे ठेवणे ;

[1]* * * * *

केंद्र शासनाच्या शक्ती. [2][२क. जेव्हा केंद्र शासनाची अशी खात्री झाली असेल की, भारतात किंवा त्याच्या कोणत्याही भागात कोणत्याही घातक अशा साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे किंवा असा प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण झालेला आहे, आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याचे सर्वसाधारण उपबंध हे अशा रोगाच्या प्रादुर्भावास किंवा त्याच्या प्रसारास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने अपुरे आहेत, तेव्हा केंद्र शासनास, [3][या अधिनियमाचा ज्यांच्यावर विस्तार आहे अशा राज्यक्षेत्रांमधील] कोणत्याही बंदरातून निघणाऱ्या किंवा अशा बंदरात येणाऱ्या कोणत्याही जहाजाची किंवा जलयानाची तपासणी करण्यासाठी आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे असे जहाज किंवा जलयान किंवा त्यातून जलप्रवासास निघणाऱ्या किंवा त्यातून येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला थांबवून ठेवण्यासाठी उपाययोजना करता येतील आणि निर्बंध विहित करता येतील.]

शक्ती सोपविणे. **[1][२ख. राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, कलम २ अन्वये त्याने वापरावयाच्या शक्ती, सदरहू अधिसूचनेत कोणत्याही शर्ती विनिर्दिष्ट करण्यात आल्यास त्या शर्तीच्या अधीनतेने, जिल्हाधिकाऱ्यांना सुद्धा आपापल्या अधिकारितेत वापरता येण्यासारख्या असतील.]**

शास्ती. ३. या अधिनियमान्वये विहित करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बंधाची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, 'भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५)' याच्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल.

या अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण. ४. या अधिनियमान्वये केलेल्या किंवा तद्न्वये सद्भावनापूर्वक करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही चालविता येणार नाही.

---

१. १९२० चा अधिनियम ३८, कलम २ व अनुसूची एक याद्वारे पोटकलम (३) वगळण्यात आले.

२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे कलम २क ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले, पूर्वीचे कलम २क हे १९२० चा अधिनियम ३८, कलम २ व अनुसूची एक यांद्वारे समाविष्ट करण्यात आले होते.

३. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ याद्वारे "भाग क राज्यातील किंवा भाग ग राज्यातील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१. १९५३ चा मुंबई अधिनियम क्र. १२, कलम २ द्वारे कलम २ख जादा दाखल केले. (१८ एप्रिल, १९५३ रोजी व तेव्हापासून).**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई